# उपनिबंधक, सहकारी संस्था, आर - दक्षिण विभाग, मुंबई.

३०३, ए विंग , बी.एम.सी. गोडावून बिल्डिंग, संस्कृती कॉम्पलेक्स, ९० फुट रोड, ठाकूर कॉम्पलेक्स,कांदिवली पूर्व, मुंबई - ४०० १०१.

---

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये आदेश ९०४

जा.क्र.मुंबई/उपनि/आर-द / बी-२/ कलम ७७/ गोपाल निवास /२०१७.
दि. 03/10/2017

वाचावे :- १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) मधील तरतूद.
२) या कार्यालयाकडील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ)अन्वयेचा दिनांक १९/०७/२००७ रोजीचे आदेश.

ज्या अर्थी, गोपाल निवास को-ऑप हौसिंग सोसा. ली ,कमला नेहरू क्रॉस रोड क्र.०३,फायर ब्रिगेड जवळ ,कांदिवली (प.), मुंबई-४०० ०६७ .हि संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९(१) अन्वये नोंदविण्यात आलेली संस्था असून ती या कार्यालयाच्या अधिकार कक्षेत येते.यापुढे तिचा उल्लेख सोईसाठी सदर संस्था असा करण्यात आलेला आहे. आणि.,

ज्या अर्थी नोंदणीकृत सहकारी संस्थेचा कारभार हा अधिनियम, नियम व संस्थेचे उपविधी यामधील तरतुदीनुसार तसेच शासनाचे वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके आदेश व निर्देश या मधील सूचनानुसार चालविला जाणे बंधनकारक आहे. आणि,

ज्या अर्थी वरील संस्था बृहन्मुंबईच्या आर-दक्षिण विभागात कार्यरत असल्याने त्या संस्थेचे निबंधक, उपनिबंधक , सहकारी संस्था , आर-दक्षिण विभाग , मुंबई हे आहेत.आणि ,

ज्या अर्थी तत्कालीन उपनिबंधक, आर विभाग यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) अन्वये संदर्भ क्रमांक २ च्या आदेशान्वये संस्थेच्या तात्काळी व्यवस्थापक समिती सदस्यांनी समिती सदस्यत्वाचे राजीनामे दिलेले असल्यामुळे कायदा कलम ७७ (अ) मधील परिस्थिती निर्माणी झाल्यामुळे संस्थेचे दैनंदिन कामकाज ठप्प झाले होते त्यामुळे संस्थेचे दैनंदिनदिन कामकाज पाहण्यासाठी प्रशासक म्हणून श्री.एस.एन.साळुंखे, सहकारी अधिकारी श्रेणी १ यांची नियुक्ती केलेली होती.आणि ,

ज्या अर्थी प्रशासक श्री.एस.एन.साळुंखे यांची सहकारी अधिकारी श्रेणी- १ या पदावरून सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था या पदावर पदोन्नती झाली असल्यामुळे तसेच संस्थेच्या कामकाजासाठी पुरेसा वेळ देत नसल्याचे या कार्यालयाच्या निदर्शनास आलेले आहे.आणि,

त्या अर्थी प्रशासकीय कारणास्तव दिनांक १९/०७/२००७ च्या आदेशात अंशतः बदल करण्याची आवश्यकता असल्याने मी खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून **मी डॉ.अविनाश भागवत,उपनिबंधक,सहकारी संस्था,आर-दक्षिण विभाग, मुंबई.** याद्वारे गोपाल निवास को-ऑप हौसिंग सोसा. ली ,कमला नेहरू क्रॉस रोड क्र.०३,फायर ब्रिगेड जवळ ,कांदिवली (प.), मुंबई-४०० ०६७. या संस्थेचे कामकाज पाहण्यासाठी तसेच सुयोग्य व्यवस्थापनासाठी श्रीमती. नजमा पटेल, प्रमाणित लेखा परीक्षक यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे.

**सदरचा आदेश आज दि.०९/१०/२०१७ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी देत आहे.**

**(डॉ.अविनाश भागवत)**
**उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, आर-दक्षिण विभाग, मुंबई.**

Scanned by CamScanner

प्रत,

१) प्रशासक , गोपाल निवास को-ऑप हौसिंग सोसा. ली ,कमला नेहरू क्रॉस रोड क्र.०३,फायर ब्रिगेड जवळ . कांदिवली (प.), मुंबई-४०० ०६७ .

२/- यांना कळविण्यात येते की संस्थेच्या दप्तराचा व मालमत्तेचा ताबा नियुक्त प्राधिकृत अधिकारी याच्या कडे देण्यात यावा व तसा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

२) श्रीमती. नजमा पटेल, प्रमाणित लेखा परीक्षक तथा प्राधिकृत अधिकारी .

२/- यांना कळविण्यात येते की संस्थेच्या दप्तराचा व मालमत्तेचा ताबा संस्थेच्या प्रशासक याच्याकडून घेऊन तसा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा व संस्थेची निवडणूक घेण्यासाठी कार्यवाही त्वरित सुरु करावी व कामकाजाचा अहवाल वेळोवेळी सादर करण्यात यावा.

३) शाखा व्यवस्थापक, दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक ली., शाखा कांदिवली , मुंबई -४०० ०६७.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर.**

१) मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (४), मुंबई.

**उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, आर-दक्षिण विभाग, मुंबई.**

उपनिबंधक, सहकारी संस्था, आर (दक्षिण) विभाग मुंबई
OFFICE OF THE DEPUTY REGISTRAR C.S.R WARD MUMBAI

16.10.17.
(Najma Patel)

Scanned by CamScanner